बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २३ | बुधवार,दि.११ मे २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# गोंदिया जि.प.अध्यक्ष,उपाध्यक्ष निवडणुकीत भाजप राष्ट्रवादी कॉँग्रेस युतीचा विजय

■ भाजपचे रहांगडाले अध्यक्ष, रॉंकाचे गणवीर उपाध्यक्ष:"चाबी'चेही भाजपला समर्थन ■ जिल्हा परिषद स्थापनेनंतर राष्ट्रवादी कॉँग्रेस पहिल्यांदाच सत्तेत



**गोंदिया–** जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेसाठी भाजपला एका सदस्याची गरज होती. भाजपमधून दोन बंडखोरी करत निवडणूक लढलेले उमेदवार निवडून आले. त्यांनी भाजपला समर्थन दिल्याने भाजपची सदस्यसंख्या २८ झाली होती. त्यामुळे भाजपची सत्ता स्थापन होणार हे सोमवारीच स्पष्ट झाले होते. मात्र राष्ट्रवादी कॉँग्रेसचे आठ आणि चाबी संघटनेच्या ४ सदस्यांनी भाजपला पाठिंबा दिल्याने भाजप समर्थित गटाची सदस्यसंख्या ४० झाली. आज, मंगळवारी पार पडलेल्या विशेष सभेत अध्यक्षपदी भाजपचे पंकज रहांगडाले आणि उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेसचे यशवंत गणवीर यांची निवड झाली,त्याना समान ४० मते पडली.

महाविकास आघाडीत फाटाफूट झाली असून कॉँग्रेस मात्र एकाकी पडली.कॉँग्रेसचे अध्यक्षपदाच्या उमेदवार उषा मेंढे व उपाध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र कटरे यांना समान १३ मते पडली.

**सोनी जिल्हा परिषद मतदारसंघातून कॉँग्रेसचे वरिष्ट नेते पी.जी.कटरे यांचा पराभव करीत पंकज रहागंडाले पहिल्यांदाच जिल्हा परिषदेत पोचले.पहिल्याच संधीत त्यांना अध्यक्षपद मिळाल्याने सोनी जिल्हा परिषद मतदारसंघाचे महत्व राजकीय क्षेत्रात वाढले आहे.**

जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मिनिमंत्रालय. या संस्थेतून जिल्ह्या-तील कानाकोप?यात विकासाच्या योजना आखून त्या पूर्ण करण्याकरिता अंमलबजावणी करण्यात येते. कोरोनाकाळात जिल्हा परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला. जिल्हा परिषदेचा कारभार मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या प्रशासकांकडे देण्यात आला होता. कोरोना संक्रमणाचा प्रभाव असल्यामुळे जिल्हा परिषदेची निवडणूक लांबणीवर पडली होती. तिस?या टप्प्यातील संक्रमण आटोक्यात आल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. जिल्हा परिषद सदस्यांकिरता दोन टप्प्यांत निवडणूक घेण्यात आली. त्याचा निकाल १९ जानेवारी रोजी जाहीर झाला. त्यात भाजपला २६, कॉँग्रेस १३, राष्ट्रवादी कॉँग्रेस ८, चाबी संघटनेचे ४ आणि भाजपतून फुटलेले दोन अपक्ष सदस्य निवडून आले. सत्ता स्थापन करण्याकरिता २७ सदस्यसंख्या असणे गरजेचे होते.



भाजपकडे एक सदस्य कमी होता. भाजपमध्ये बंडखोरी करून निवडून आलेले सदस्य देखील तटस्थ होते. परिणामी भाजपच्या बंडखोरांना हेरून चाबी संघटनेच्या सदस्यांच्या मदतीने महाविकास आघाडी सत्ता स्थापनेचे स्वप्न बघू लागले होते. जिल्हा भाजपने दोन्ही अपक्षांची मनधरणी केली. त्यानंतर सोमवारी भाजपच्या सत्ता स्थापनेचे चित्र स्पष्ट झाले होते. ऐनवेळी कॉँग्रेसने अडवणुकीची भूमिका घेतल्याचा आरोप राष्ट्रवादीने करत भाजपला समर्थन दिले. चाबी संघटनेच्या ४ सदस्यांनी देखील भाजपला समर्थन दिले. त्यामुळे भाजपच्या गटाचे ४०, तर कॉँग्रेसकडे १३ सदस्यसंख्या होती. जिल्हा परिषदेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच कॉँग्रेसवर विरोधी बाकावर बसण्याची वेळ आली आहे.

## कॉँग्रेसच्या एकांगी भूमिकेमुळे निर्णय

राज्यात महाविकास आघाडी आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत देखील महाविकास आघाडीचा धर्म पाळण्याचा आम्ही पुरेपूर प्रयत्न केला. सुरुवातीपासूनच आम्ही महाविकास आघाडीची सत्ता स्थापन करण्याची भूमिका घेतली. मात्र कॉँग्रेसच्या वरिष्ठांनी एकांगी भूमिका घेतली. त्यामुळे आम्हाला देखील सत्तेसोबत जाण्याचा निर्णय घ्यावा लागला.

**गंगाधर परशुरामकर,जिल्हाध्यक्ष रॉंका**

## आता लक्ष सभापतीपदांकडे

गेल्या तीन महिन्यांपासून सत्ता स्थापनेकडे जिल्हावासींचे लक्ष ला-गले आहे. आज अडीच वर्षांकरिता अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाकरिता मतदान घेण्यात आले. त्यात भाजप, राष्ट्रवादी कॉँग्रेस, चाबी संघटन आणि दोन अपक्ष यांनी मिळून सत्ता स्थापन केली. अडीच वर्षांकरिता भाजपला अध्यक्ष, तर राष्ट्रवादीला उपाध्यक्षपद मिळाले. आता विषय समिती सभापतीपदाकडे लक्ष लागले आहे. यात दोन अपक्षांना प्रत्येकी एक, चाबी संघटनेला एक आणि भाजपला एक सभापतीपद मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## युती भद्र, की अभद्र

यापुर्वी जिल्हा परिषदेत कॉँग्रेसने युतीधर्म नाकारात राष्ट्रवादी कॉँग्रेसला बाजूला सारून भाजपसोबत जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन केली होती. त्यामुळे राष्ट्रवादी कॉँग्रेसने अभद्र युती केल्याचा आरोप कॉँग्रेसवर केला होता. आता खुद्द राष्ट्रवादी कॉँग्रेस देखील भाजपसोबत गेली. त्यामुळे आता ही युती भद्र, की अभद्र अशी टिका होत आहे.मात्र या युतीमुळे भारतीय जनता पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यामध्ये नाराजी असून बहुमत असताना राष्ट्रवादीच्या मदतीची गरजच काय अशा सूर उमटत होता.नेत्यांच्या चेहऱ्यावर आनंद तर कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसून येत होती.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पहिल्यांदाच सत्तेत

जिल्हा परिषदेच्या राजकारणाकडे बघितले गेल्यास २००० मध्ये पहिल्यांदा स्थापन झालेल्या जिल्हापरिषदेपासून बघितल्यास कॉँग्रेस राष्ट्रवादीची कधीही युती झाली नाही.नेहमी कॉँग्रेसने भाजपसोबत हातमिळवणी करुन सत्ता स्थापन केली.२२ वर्ष राष्ट्रवादीला सत्तेबाहेर राहावे लागले.तर यावेळी मात्र नेहमी सत्तेत राहिलेल्या कॉँग्रेसला सत्तेबाहेर ठेवत राष्ट्रवादी कॉँग्रेस पहिल्यांदाच जिल्हा परिषदेच्या सत्तेत सहभागी झाली आहे.

**दरम्यान राकॉंपा नेते माजी आमदार राजेंद्र जैन यांनी आम्ही विकासाच्या मुद्यावर भाजपसोबत जिल्हा परिषदेच्या सत्तेत सहभागी झाल्याचे सांगितले.**



## माजी आमदार वाघमारांचे ६ वर्षाकरिता निलंबन

**भंडारा–** गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने भारतीय जनता पक्षाला वेठीस धरून, मनमजी कारभार करणारे, भाजपाच्या विरोधात लढणारे आणि लढविणारे चरण वाघमारे यांना भारतीय जनता पक्षाने बाहेरचा रस्ता दाखवला. पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आमदार मा चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी निलंबनाची घोषणा केली. तसेच तुमसर विधानसभा क्षेत्रातील भाजपाची तुमसर तालुका, तुमसर शहर, मोहाडी तालुका, व मोहाडी शहरं ह्या सर्व कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असल्याची सुद्धा घोषणा केली.भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांनी पक्षाचा व्हिप स्विकारले नाही त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई पक्षाकडून करण्यात येणार आहे.




# जि.प.अध्यक्ष निवडणुकीचे आमदार रहांगडाले खरे किंगमेकर

**गोंदिया–** जिल्हा परिषदेच्या पुढील अडीच वर्षांसाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन्ही पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार हे १० मे रोजी या निवडणुकीचे किंगमेकर ठरलेल्या आमदार विजय रहांगडाले यांनी दाखवून देत येत्या काळातील अनेक राजकीय गोष्टींचा त्यांनी अनपेक्षितपणा उलगडा केलाच नव्हे तर अनेकांना राजकीय धक्का सुध्दा देत आपली चुणूक दाखवली आहे.

सर्वाधिक २६ जागा जिंकल्यानंतरही बहुमतासाठी १ जागा कमी पडल्याने भाजप सत्तेत येणार की नाही यावर शंका कुशंका असतानाच जिल्हा परिषदेच्या आपल्या राजकीय अनुभवासोबतच तिरोडा गोरे-गाव विधानसभा मतदारसंघातून दोनदा विजयश्री खेचून आणणारे तिरोडा-गोरेगाव मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले हेच खरे यावेळच्या जिल्हा परिषदेच्या सत्तेच्या समिकरणाचे खरे किंगमेकर ठरले आहेत.

भाजपच्या दोन्ही अपक्ष बंडखोरांना भाजपसोबत जुळवून घेत त्यांच्या पक्षप्रवेश करण्यापर्यंत पक्षातील जेष्ठनेत्यांसह आजी माजी खासदार व आमदारांशी सल्लामसलत करुन तसेच चाबी संघटना(जनता की पार्टी)चे प्रमुख आमदार विन-ोद अग्रवाल यांच्याशी असलेली जिल्हापरिषदेपासूनच्या जवळीकची संधी साधत त्यांनी २६ सदस्य संख्या असलेल्या भाजपच्या आघाडीत ४० सदस्य संख्या करुन सर्वाधिक मतानी अध्यक्ष निवडणून आणण्याची किमया घडवून आणली आहे.जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढी मते अध्यक्षांना मिळालीत.

गोंदिया तालुक्यातील अपक्ष उमेदवार रुपेश कुथे यांचे गोंदियाती माजी आमदारांशी जुळत नाही,तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील अपक्ष उमेदवार पौणीमा उमाकांत ढेंगे यांची एका विद्यमान आमदारांनी उमेदवारी कापल्याने त्यांची त्यांचाशी जमत नव्हते.मात्र विजय रहागंडाले यांनी दोघांशी समन्वय साधत खासदार सुनिल मेंढे आणि संघटनमंत्री विरेंद्र अंजनकर,जिल्हाध्यक्ष केशव मानकर यांच्या सहकार्याने त्या दोघांचा भाजप प्रवेश करुन बहुमत मिळवून घेतले.सोबतच चाबी संघटनेच्या नेत्याकडूनही समर्थन मिळवून घेत यशस्वी शिष्टाई केली,त्यामुळेच भाजपला हा बालेकिल्ला सर्वाधिक मतांनी आपल्या ताब्यात ठेवता आला.

त्यातच कॉँग्रेसने नेहमीच राष्ट्रवादीला दिलेला दगाफटका आणि भंडारा जिल्हा परिषदेच्या राजकीय गणिताच्या जुळवाजुळवीत गोंदियातही राष्ट्रवादीने भाजपला साथ देण्याचे ठरविल्याने उपाध्यक्ष पद वरिष्ठांच्या सम्मतीने त्यांच्याकडे देत नवी युती याठिकाणी घडवूण आणण्यात त्यांची महत्वाची भूमिका राहिली आहे.

विशेष म्हणजे ५३ सदस्य संख्या असलेल्या जिल्हा परिषदेत भाजप २६,कॉँग्रेस १३,राष्ट्रवादी कॉँग्रेस ८,चाबी ४ व अपक्ष २ असे आहे. आत्ता सभापतींच्या निवडणुका कशापध्दतीने हाताळतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.












## संपादकीय

### राजद्रोहाचा गुन्हा स्वस्त झालाय का?

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा व त्यांचे पती आमदार रवी राणा यांच्यावर मुंबई पोलिसांनी दाखल केलेला राजद्रोहाचा गुन्हा चुकीचा आहे, अशा शब्दांत न्यायालयाने फटकारले आहे. राजद्रोहाचा गुन्हा ठाकरे सरकारच्या कारकिर्दीत इतका स्वस्त झालाय का? राजद्रोहाचा गुन्हा हा अतिशय गंभीर समजला जातो. राणा दाम्पत्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या खासगी निवासस्थानासमोर हनुमान चालिसा पठण करण्याची घोषणा केली, त्याचा परिणाम त्यांची रवानगी तुरूंगात झाली. शिवसैनिकांना चकवा देत हे दाम्पत्य मुंबईत त्यांच्या घरी पोहोचले, याचा राग महाआघाडी सरकारला आला असावा. मुंबई पोलिसांनी या दाम्पत्याविरोधात कठोर कलमे लावून गुन्हे दाखल केले. त्यांनी मातोश्रीवर जाण्याच्या वल्गना केल्या, इशारे दिले, शिवसैनिकांना आव्हान दिले, त्याचा परिणाम त्यांच्या मुंबईतील घराभोवती पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला, तर त्यांच्या निवासस्थानाबाहेर शिवसैनिकांनी ठिय्या मांडला. एवढ्या बंदोबस्तापुढे त्यांना घराबाहेर पडणेही अशक्य होते. पंतप्रधान मुंबईत येत असल्याचे कारण सांगून त्यांनी चालिसापठण आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. पण त्यांना शेवटी पोलीस कोठडीत जावे लागले.

राणा दाम्पत्याने जाहीर केलेले आंदोलन केलेच नाही, मुख्यमत्र्यांच्या खासगी निवासापुढे चालिसा पठण केले नाही, एवढेच नव्हे तर ते घराबाहेरही पडले नाहीत. तरी त्यांच्यावर भारतीय दंडसंहितेच्या कलम १२४-अ नुसार पोलिसांनी राजद्रोहाचा गुन्हा नोंदवला, हेच मोठे आश्चर्य होते. बारा दिवस या दाम्पत्याला जेलमध्ये काढावे लागले. ठाकरे सरकारला त्यांना कोणी आव्हान दिलेले आवडत नाही. त्यांना कोणी जोरदार विरोध केलेला पसंत नाही. यापूर्वी राज्यात अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती व राष्ट्रवादी काँग्रेसचा गृहमंत्री होता, पण त्यांच्या काळात विरोधी पक्षाला कधी सुडाने वागवले नव्हते. विरोधकांवर राजद्रोहाचे गुन्हे दाखल करून त्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न यापूर्वीच्या सरकारने कधी केल्याचे उदाहरण सापडत नाही. मातोश्रीला आव्हान दिल्यावर काय परिणाम होऊ शकतो?, हे नवनीत राणा व रवी राणा यांना जेलमध्ये डांबून या सरकारने दाखवून दिले. आमचे सरकार आहे, मुंबईवर आमची हुकमत आहे, आम्ही म्हणू तसेच राज्यात घडेल, असा संदेश राणा दाम्पत्यावरील कारवाईतून सरकारला द्यायचा होता, असे वाटते. विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी पोलीसबळाचा किती टोकापर्यंत वापर होऊ शकतो, हे अशा कारवाईतून ठाकरे सरकारने दाखवून दिले.

राणा दाम्पत्याची भाषा कडक होती, सरकारला आव्हान देणारी होती. पण ती भाषा चिथावणीखोर होती, असे न्यायालयाला वाटले नाही. सरकारविरोधात हिंसा घडविण्यासाठी जाणीवपूर्वक चिथावणीखोर भाषणे देणे किंवा कायदा सुव्यवस्था बिघडवणे, असा हेतू राणा दाम्पत्याचा होता काय? हे दाम्पत्य त्यांच्या घरातून बाहेरच पडलेले नाही. ज्यांचे मुंबईत कोणी फारसे अनुयायी नाहीत, ज्यांनी आंदोलन मागे घेतले, मग राजद्रोहाचा गुन्हा कशासाठी? राजद्रोहाचा गुन्हा दाखल करणे ही काही साधी सोपी बाब नव्हे. पोलीस स्टेशनचे अधिकारी वरिष्ठांना विचारल्याशिवाय एवढी गंभीर कलमे लावणार नाहीत. वरिष्ठही उच्चस्तरीय सल्ला मसलत केल्याशिवाय असे धाडस करणार नाहीत. राणा दाम्पत्यावर कोणाच्या सल्ल्यामुळे राजद्रोहाचा गुन्हा दाखल झाला? हे पुढे आले नसले तरी सरकारच्या सूचनेशिवाय व आशीर्वादाशिवाय पोलिसांना अशी कारवाई करणे, शक्य तरी आहे काय? आश्चर्य वाटते, ते गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या ठाम भूमिकेचे. राणा दापंत्याच्या विरोधात न्यायालयाने सरकारला झापले. राजद्रोहाचा आरोप सिद्ध होईल असा पुरावा नाही, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवले तरी गृहमंत्री आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. "टिप्पणी करणे हा न्यायालयाचा अधिकार आहे, पण पोलिसांनी अभ्यास करूनच राणा दाम्पत्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला", असे गृहमंत्री म्हणत आहेत. राजद्रोहाचा गुन्हा दाखल करताना पोलिसांचा अभ्यास कमी पडला, हे गृहमंत्री मान्य करायला तयार नाहीत. राणा दाम्पत्यावर राजकीय हेतूनेच राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला होता, हे आता उघड झाले आहे. मात्र ज्या घिसाडघाईने राणा दाम्पत्यावर राजद्रोहाची कलमे लावली गेली, त्याविषयी जनतेत तीव्र नापसंती आहे. राणा दाम्पत्य हे आपले राजकीय शत्रू आहे, या भावनेने त्यांना या सरकारने वागणूक दिली व त्यासाठी पोलीस बळाचा वापर केला, हे जास्त गंभीर आहे.

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, कोतुळचे पाटील, छ.गायकवाड, जात व नवनित राणा

२०११ सालातील सप्टेंबर महिन्यात गणपतीत कोर्टात फारसे काम नसल्यामुळे रजा टाकून पत्नीसह भंडारदरा धरण व हरिचंद्र गड पहाण्यासाठी दोघेच गेलो होतो. हरिचंद्र गडाकडे जाण्यासाठी कोतुळ ता.आकोले जि.अहमदनगर या गावात आलो. हे गाव साधारण संगमनेर पासुन चाळीस पन्नास की.मी. अंतरावर आहे. शेती, डोंगरदऱ्या हिरव्यागार झालेल्या अधूनमधून चिखल लागत होता.

माझा मित्र श्री.सुरेश कोते, लिज्जत पापडचा आधारस्थंभ व आभिनव शिक्षण संस्थेचा संस्थापक ह्याचे कोतुळ गावचा पण पुण्यात स्थाईक झालेला. गावाला अभिनव शिक्षण संस्था स्थापण करून नर्सरी ते मॅनेजमेंट पदवी पर्यंतचे इंग्रजी माध्यमातुन शिक्षणाची सोय केलेली. त्याला फोन केला. तो कोठेतरी काश्मीरला लिज्जत पापडची शाखा ऊघडण्यासाठी गेलेला. तो फोनवर म्हणाला "तुम्ही दोघेच अहात तर गडावर जाऊ नका. वाट निसरडी झालेली असते. त्यापेक्षा माझे गाव बघा. भंडारदरा धरण व परिसर बघा. तुझ्या गावात आष्टविनायकापैकी मयुरेश्वर गणपती मंदीर आहे पण माझ्या गावात डॉ बाबासाहेब आंबेडकर, कर्मविर भाऊराव पाटील राहून गेलेत".

हे ऐकल्यावर मी कोतुळ गावातील पाटलांकडे डॉ आंबेडकर कधी व का येऊन गेले याबाबत चौकशी केल्यावर समजले की..... या गावचे कै.भाऊ दाजी पाटील नावाचे गावचे पाटील होते. त्यांचा टोलेजंग वाडा गावात होता. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड हे त्यांचे जिवलग मित्र व नाते संबधी. पाटलांच्या वतनदारी व जमीनी बाबतचा खटला मुंबई हायकोर्टात होता. तो खटला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवावा ही त्यांची इच्छा होती.

त्याची व बाबासाहेबांची ओळख नव्हती व इतर कामाच्या व्यापामुळे ते फारच निवडक खटले हायकोर्टात चालवित होते. डॉ बाबासाहेबांचे व महाराज सयाजीराव गायकवाडांचे खुपच सख्य होते. ते महाराजांची कोणतीच विनंती नाकारत नसत. म्हणून पाटील महाराजांच्याकडे बडोद्याला गेले. त्यांनी महाराजांच्या मार्फत बाबासाहेबांना हायकोर्टात वकीलपत्र घेण्याची विनंती केली. महाराजांनी सांगितले म्हणून बाबासाहेबांनी पाटलांचे वकिलपत्र घेतले. बाबासाहेबांनी हायकोर्टात युक्तीवाद करून ती केस जिंकली.

महाराजांच्यामुळे डॉक्टर बाबासाहेबांच्या फी बाबत कांहीच ठरले नव्हते. पण पाटलांनी बाबासाहेबांना आग्रह केला की तुम्ही जी सांगाल तेव्डी फी मी देईन पण तुम्ही माझ्या गावाला माझ्या घरी यायच व माझा व माझ्या गावाचा पाहूणचार घ्यायचा. त्यांच्या प्रेमळ आग्रहाखातर बाबासाहेब कोतुळला जायला तयार झाले. पण त्यांनी पाटलांना एक अट टाकली की "तुमच्या वाड्यात माझ्या बरोबर तुमच्या गावातील माझ्या समाजातील लोकांनाही जेवायला बोलवायचे. तीच माझी फी आसेल".पाटलांनी ती अट आनंदाने कबुल केली.

त्यानुसार १७ एप्रिल १९४१ रोजी कोतुळला डॉक्टर बाबासाहेब पाटलांच्या वाड्यावर आले. पाटलांनी गावातील सर्वच खालच्या जातीतील लोकांसह गावकऱ्यांना वाड्यावर जेवायला बोलवले. वाड्यातील चोपाळ्यावर बाबासाहेबांना बसवून पाटलांनी त्यांचा यथोचीत सत्कार करून कांही हजार रूपये देऊ केले व स्वतः झोपाळ्याला झोका दिला. बाबासाहेबांनी ते पैसे घ्यायला नकार दिला. वाड्यावर बाबासाहेबांच्या पंक्तीला पाटलाच्या वाड्यात गावकुसाबाहेरची, खालच्या जातीची मंडळी पाटील, देशमुखांच्या मांडीला मांडी लावून जेवली.

पाटलाने वाड्यावर बाबासाहेब आले म्हणून मोठा ऊत्सवच साजरा केला. तो स्वातंत्र्य पुर्व काळ पाटील, देशमुख इत्यादी मराठा व ब्राम्हण जातीबाबत अत्यंत कर्मठ असलेल्या काळात कोतुळच्या पाटलाने जातीव्यवस्थेवर बाबासाहेबांच्या उपस्थितीत केलेला हल्ला त्या गावापुरता तरी यशस्वी झाला.

पाटील गेले, त्यांची मुले काळाच्या पडद्याआड गेली. सध्या त्यांची नातवंडे आहेत. पण सन १९४१ सालापासून आज तागायत तब्बल ८० वर्षे झाली, दरवर्षी १७ एप्रील या दिवशी त्याच पाटलांच्या वाड्यावर त्यांचे वंशज व कोतुळ गाव डॉक्टर बाबासाहेबांच्या भेटीच्या स्मृती प्रित्यर्थ सर्व जातीधर्माच्या लोकांना एकत्र जेवण देऊन सण साजरा करत आहेत.

मशिदीवरील भोंगे व हनुमान चालीशी वरून सर्व राज्यच अस्वस्थ व ढवळून निघालेले. त्यात हनुमानचालीशी वरून राणा दांम्पत्यांनी घातलेला गोंधळ व त्यांना केलेली अटक पाहीली. मी खालच्या जातीची आहे म्हणून माझा पोलीसांनी छळ केला ! अशी दांभिक तक्रार करणाऱ्या नवनित राणा सारख्या लोकप्रतीनिधी तर त्याला भेसुर व भयावह अर्विभावात साथ देणारे राजकीय पक्षनेतेही पाहीले की एक गोष्ट लक्षात येते की सर्वसामान्य जनतेच्या मनात जातपात धर्म व्देष नसतो तर सत्तेसाठी राजकारणी जातीपाती, धर्मव्देष लोकांच्या मनात कसे निर्माण करतात हे जानवते. पण आम्ही व आमची मनेच इतकी मुर्दाड, भावनाहीन, निर्जीव झालीत की आम्हाला कश्याचेच काही वाटेनासे झालेय.

लोकांच्यात जर खरेच बदल घडवून आणायचा असेल तर या देशात दोन चार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व प्रत्येक गावात कोतुळच्या भाऊ दाजी पाटलांसारखे एक एक पाटील हवेतच हवेत.

**ॲड.बाळासाहेब खोपडे, पुणे**
**१८ एप्रील २०२२**

# स्त्री हक्क कायद्याचा जनक:छत्रपती राजर्षी शाहू महाराज

छत्रपती राजर्षी शाहू महाराज म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणाकरिता निर्माण केलेल्या स्वराज्याचे वैचारिक - कर्तृत्ववान शेवटचे वारसदार. शिवाजी महाराजांनी स्त्रीची बेअब्रू करणाऱ्या रांझाच्या पाटलाचे हात-डोळे कलम केलेत. कल्याणच्या मुस्लिम सरदाराच्या सुनेचा आई समजून आदरतिथ्य करून सन्मानाने पाठवणी केली. सावित्रीबाई गायकवाडाचे जिंकलेले राज्य परत केले आणि सावित्रीबाईला बहिणीचा दर्जा दिला. स्वराज्याचे युवराज आणि दुसरे छत्रपती संभाजी महाराजांनी सुद्धा शिवाजी महाराजांच्याच आदर्शचा अवलंब स्त्रियां बाबतीत केला. स्त्रियांना न्याय देणाऱ्या स्वराज्याच्या गादीचे छत्रपती होताना शाहू महाराजांसमोर असा नैतिक वारसा होता. तो वारसा यथार्थपणे पार पाडण्याचे काम शाहू महाराजांनी केले.

हजारो वर्षापासून भारताची संस्कृती पुरुषप्रधान. स्त्रीला कायम दुय्यम दर्जाची वागणूक. वर्णश्रमानुसार स्त्री ही कोणत्याही वर्णतिल (ब्राम्हण क्षत्रिय, वैश्य, शूद्र) असो तिला शूद्रच मानल्या गेले होते. अनेक जाचक नियम, रूढी तिच्यावर लादण्यात आले होते. जसे - सती, केशवपण, विधवा, पुनर्वविवाह प्रतिबंध, शिक्षण बंदी असे अनेक. स्त्रीचा जणू जगण्याचा हक्कच इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने हिसकावून घेतला होता. महाराजांच्या आधी स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम अनेक सुधारकांनी केलेत. त्यात अग्रक्रमाने महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीमाई फुले यांचे नाव घ्यावे लागेल. शाहू महाराजांना जसा स्वराज्याचा वारसा लाभला तसाच परिवर्तनवादी विचारांचा वारसा महात्मा फुलेंकडून मिळाला. स्वराज्य आणि सत्यशोधक विचारांची सांगड घालून महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणा बरोबरच तिच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे कायदे बनवून ते अमलात आणून स्त्रियांवरील होणारे अन्याय थांबवीण्याचे काम भारताच्या या आधुनिक ऋषीने केले आहे.

**स्त्री शिक्षण:-** महाराजांनी स्त्री शिक्षणाची सुरुवातच घरातून केलेली आहे. त्यांनी स्वतःच्या सुनेला उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. मुलींच्या शिक्षणाची फी माफ करण्याचे धोरण अवलंबले. संस्थांनातिल मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी रखमाबाई केळवकर यांची स्त्री शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली होती.



मुलींच्या शिक्षणाकरिता भुदरगड व इतर भागात स्वतंत्र शाळा स्थापन केल्या होत्या. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने रु. ४० च्या अशा पाच शिष्यवृत्तया चौथ्या वर्गात सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थिनीना देण्यात येत होत्या. मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे म्हणून राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना उच्च शिक्षण मोफत केले. खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या बाबतीत महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुलेंचा वारसा चालवणारा व्यक्ती म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज. अनेक वर्षापासून मराठा सेवा संघाद्वारे उच्च शिक्षण माफ करावे अशी मागणी केल्या जात आहे, परंतु उद्योगपत्यांचे हजारो करोडोचे कर्ज माफ करणाऱ्या सरकारला ही मागणी दिसत नाही.

आंतरजातीय विवाह कायदा :- १९१७ ला सरदार वल्लभभाई पटेलांचे बंधू विठ्ठलभाई पटेल यांनी मंत्रीमंडळात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा मांडला. या कायद्याला पुरीच्या शंकराचार्यासह अनेक धार्मिक नेत्यांबरोबरच राष्ट्रीय पातळीवरिल मोठे नाव असलेले बाळ गंगाधर टिळक यांनी ही पटेलांच्या या कायद्याला विरोध केला होता. शाहू महाराजांनी पटेलांची पाठराखण करत जाहीर पाठिंबा तर दिलाच परंतु कोल्हापूर संस्थानात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा जुलै १९१९ मध्ये तयार केला. हा कायदा महाराजांनी दोन भागात केला.

१) या कायद्याअंतर्गत पुरुषांच्या लग्नाची वय १८ वर्षे तर स्त्रीचे वय १४ वर्षे असा नियम घातला. इंग्रजांनी 'संमती वयाचा' जो कायदा बनविला होता त्यात मुलीची संतती (शारीरिक संबंध) वय १० वर्षे ऐवजी १२ वर्षे करण्यात आली होती. या कायदाला सुद्धा बाळ गंगाधर टिळक यांनी विरोध केला होता. इंग्रजांच्या कायदाचा विचार करता शाहू महाराजांचा कायदा किती पुरोगामी होता. स्त्रियांनो तुमचे विरोधक आणि समर्थक जाणून घ्या.

२) दुसऱ्या भागात कोणत्याही जाती-धर्मिय मनुष्याशी स्त्रीला विवाह करण्याचा मुभा देणारा कायदा, यात वारसा हक्काचा सुद्धा अधिकार देण्यात आला आहे.

**घटस्फोटासंबंधी कायदा:-** त्या काळात घटस्फोटासंबंधीचे जात पंचायतीचे कायदे होते, परंतु ते पुरुषांना अनुकूल होते. घटस्फोटासंबंधी निर्णय देतांना स्त्रीवर अन्याय होत असे. घटस्फोटा संदर्भात स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून २ ऑगस्ट १०१९ रोजी कोल्हापूरचे काडी मोडण्याचे नियम असा कायदा केला. या कायद्यात स्त्री हक्काचे संरक्षण आणि स्त्रीला पोटगी देण्याची तरतूद करण्यात आली होती. जानेवारी १९२० मध्ये वारसा हक्काच्या कायद्यात दुरुस्ती करत घटस्फोटानंतर मुलांना मात्र जन्म दिलेल्या बापाच्या संपत्तीत वारसा हक्क देण्याचा नियम केला. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून जे हक्क दिलेत त्याची पायाभरणी शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात केली होती.

**विधवा पुनर्वविवाह कायदा :-** बालविवाहाची प्रथा असताना मुलीच्या तुलनेत पुरुष वयाने अधिक मोठा असायचा, त्यामुळे स्त्रियांना बऱ्याचदा कमी वयातच विधवेचे जीवन जगावे लागत असे. धर्माने पुरुषांला कितीही लग्न करता येत असे परंतु स्त्रीला मात्र पुनर्वविवाह नाकारण्यात आला होता. शाहू महाराजांनी या सर्व धार्मिक रूढी, परंपरा नाकारत स्त्रीला सन्मानाने जगता यावे, तिच्याही भाव भावनांचा सन्मान व्हावा म्हणून १९१७ साली विधवा पुनर्वविवाहाचा कायदा केला. समस्त स्त्रियांनी शाहू महाराजांचे आभार मानायला हवेत.

**स्त्रियांना क्रुरपणे वागवीण्यास प्रतिबंध करणारा कायदा :-** सर्वच धमीयांच्या कुटुंबात स्त्रीचा वेगवेगळ्या प्रकारे छळ केल्या जायचा, आजही काही प्रमाणात सुरूच आहे. या छळाला प्रतिबंध घालण्याकरिता जुलै १९१९ मध्ये 'स्त्रियांना कूरपणेवागवीण्यास प्रतिबंध करणारा कायदा' केला. या कायदात इतर तरतूदीप्रमाणे १) गुन्हेगाराला सहा महिन्या पर्यंत कैद व २००/- रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद होती.

**देवदासी (जोगत्या-मुरळ्या) प्रतिबंध कायदा :-** हिंदू धर्मातील देवांना मुली वाहण्याची वाईट प्रथा म्हणजे देवदासी प्रथा. धर्माचा हा अत्यंत वाईट स्वरूप होता. म्हणून संस्थानातिल देवदासी प्रथा बंद करण्याकरिता १७ जानेवारी १९२० ला मदेवदासी मप्रतिबंध कायदाफ केला.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेले कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे कायदे होत. १०० वर्षापूर्वी शाहू महाराज स्त्रियांच्या उद्धाराचा विचार करुनच थांबले नाही तर कायदे करून ते अंमलात आणले होते. आम्ही निवडून दिलेले सरकार सुद्धा स्त्रियांच्या संरक्षणा बाबतीत जेवढ दक्ष दिसत नाही, तेवढे दक्ष शाहू महाराज होते. आजच्या सुशिक्षित स्त्रिया वैभव लक्ष्मीच्या पारायणात आणि कर्मकांडात गुंतल्या आहेत, परंतु महाराजांच्या विचारांचा स्वीकार करतांना दिसत नाही. त्यांच्या चरित्राचे वाचन करतांना दिसत नाही. आजच्या उच्च शिक्षित स्त्रियांनी शाहू महाराजांचे चरित्र वाचले असते तर त्यांनी वडाला फेऱ्या मारण्याऐवजी यानात बसून पृथ्वीला फेऱ्या मारून संपूर्ण ब्रम्हाण्ड फिरून आल्या असत्या. परंतु दुर्दैव आहे शिकून सवरून सुद्धा स्त्री कर्मकाडाच्या बाहेर निघण्यास तयार नाही. मग आमच्या या शिक्षणाचे फलित काय ..?

**अनिल भुसारी, तुमसर, जि. भंडारा**
**८९९९८४३९७८**

## नियमबाह्यपणे वाहनावर महाराष्ट्र शासन लिहिणाऱ्यांवर कार्यवाही करा




**देवरी:-** महाराष्ट्रातील संपूर्ण अधिकारी व त्यांच्या अधिनस्थ येत असलेलया विभिन्न विभागांतील अन्य खाते वाहनांवर नियमबाह्य महाराष्ट्र शासन लिहून वाहने चालविली जात आहेत. याची नरेशकुमार जैन यांनी परिवहन आयुक्त परिवहन आयुक्त कार्यालय मुंबई यांना पत्राद्वारे तक्रार करून कार्यवाहीची मागणी केली आहे.

तक्रीतून महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्हाधिकारी यांना व त्यांच्या अधिनस्त येत असलेलया सर्वच विभागांतील अधिकाऱ्यांना त्याचे खाते वाहनावर महाराष्ट्र शासनाकडून अथवा परिवहन आयुक्त कार्यालयाकडून (आरटीओ) महाराष्ट्र शासन लिहिण्याची कोणतीच मुभा देण्यात आलेली नाही. मात्र, यानंतर नियमबाह्य महाराष्ट्र शासन लिहून खाते वाहने मार्गस्थ करण्यात येत आहेत. ही बाब न्यायसंगत नसून मोटारवाहन कायद्याचे उल्लंघन करणारी असलयाचे म्हणटले आहे. राजशिष्टाचार विभाग (सामान्य प्रशासन विभाग), महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्यामार्फत सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) कार्यालयाला अतिविशिष्ट मान्यवरांच्या परिवहन व्यवस्थेकरिता असलेले वाहन (डी.व्ही.वाहन), डी.व्ही. वाहने उपलब्ध करून दिली आहेत. त्याच डी.व्ही. वाहनाच्या पुढील व मागील बाजूस ठळकपणे महाराष्ट्र शासन असे लाल रंगाने रंगवून घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त शासनाच्या कोणत्याही अन्य खाते वाहनांवर महाराष्ट्र शासन लिहिता येत नसल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केलेले आहे. तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी व कार्यवाहीसाठी महाराष्ट्रातील प्रादेशिक परिवहन अधिकारी व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना आपल्या स्वाक्षरीसह आदेशित करून त्यांच्या कार्यालयाच्या आयूवेग पथकामार्फत शासनाच्या खाते वाहनावर महाराष्ट्र शासन असे लिहिलेले आढळल्यास अशा वाहनांवर मोटारवाहन कायदा व नियमाअंतर्गत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी नरेशमुकार जैन यांनी केली आहे.

# धान खरेदी गैरप्रकाराचा तपास सीबीआयकडे



**गोंदिया:** पूर्व विदर्भातील गोंदिया व भंडारा या दोन जिल्ह्यात विक्रमी धान उत्पादन होते. धानाच्या हमीभावासाठी जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने संचालित आधारभूत हमीभाव धान खरेदी केंद्रावरुन धानाची खरेदी करण्यात येते. मात्र, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये मोठ्या प्रमाणात धान खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले. याबाबीची तक्रार करण्यात आली होती. तसेच ही बाब खासदार मेंढे यांनी लोकसभेत उपस्थित केल्यानंतर मंत्री पियुष गोयल यांनी संपूर्ण गैरप्रकाराचा तपास आता सीबीआय करणार, अशी ग्वाही देत तसेच निर्देश यंत्रणेला दिले आहे. यामुळे गोंदिया-भंडारा जिल्ह्यात धान खरेदी केंद्रातील धान खरेदीचा गैरव्यवहार उजेडात येणार आहे.

पूर्व विदर्भातील जिल्ह्यात जिल्हा आदिवासी विकास महामंडळ तसेच जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने धान खरेदी करण्यात येते. गोंदिया जिल्ह्याचा विचार केल्यास दोन्ही संस्थेचे जवळपास १४७ आधारभूत धान खरेदी केंद्र आहेत. मागील काही वर्षापासून धान खरेदी केंद्रावरुन गैरप्रकार लपून राहिलेला नाही. अनेक संस्थाचालक शेतकऱ्यांचे बोगस ७/१२ तसेच व्यापारी वर्गही शेतकऱ्यांना धमकावून त्यांच्या ७/१२ वर नियोजित संस्थेत धान विक्री करीत असल्याचा प्रकार समोर आला. ही बाब लोकप्रतिनिधीच्या लक्ष्यातही होती. त्यातच प्रकरणाची तक्रारही करण्यात आली.

या तक्रारीची दखल घेत खासदार मेंढे यांनी हा मुद्दा लोकसभेत प्रश्नोत्तराच्या काळात उपस्थित केला. तसेच सन २०२१-११ या वर्षातील धान खरेदीतील गैरव्यवहारातील सविस्तर माहिती सादर केली. यावर मंत्री पियुष गोयल यांनी धान खरेदीतील गैरव्यवहार चौकशीसाठी सीबीआयकडे हा प्रकरण वळती करण्यात येत असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे धान खरेदीतील गैरप्रकारातील चौकशी प्रकरण चक्क आता सीबीआयकडे गेल्याने या गैरव्यवहारातील अनेक घबाळ समोर येण्याची शक्यता आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

## चिचगड -ककोडी मार्गावर जनावरांची अवैध वाहतूक जोमात

**चिचगड:-**महाराष्ट्र छत्तीसगड राज्याच्या सिमेवर असलेल्या चिचगड पोलिस स्टेशनच्या परिसरातून मोठयाप्रमाणात अवैधरित्या जनावारांच्या वाहनांची वाहतूक ककोडी-चिचगड मार्गावर होत असून पोलिस बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे.

नागरिकांच्या माहितीनुसार रात्रीला २ ते ५ वाजेदरम्यान अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जाते.त्या वाहनात जनावरांना नेतांना कोंबून नेले जात असून शासन नियम धाब्यावर बसवले जात असल्याचे म्हटले आहे.या अवैध वाहतुकीला पायबंद घालण्यात चिचगड पोलिस प्रशासन अपयशी ठरल्याचेही नागरिकांचे म्हणने आहे.अवैध शिष्टाईसाठी यागोष्टीला पायबंद घालण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा सुर नागरिकांनी व्यक्त केला आहे.

छत्तीसगड राज्यातून मोठ्याप्रमाणत जनावरांची वाहतूक अवैधरित्या करण्यासाठी या मार्गाची निवड करण्यात आली असून परिसरात काही दलाल ही वाहने पास करण्यासाठी पोलिसांना मदत करत असल्याचे ही नागरिकांचे म्हणने आहे. नागरिकांनी उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांच्याकडे या प्रकाराकडे लक्ष घालून या जनावरांच्या अवैध वाहतुकीवर आळा घालण्याची मागणी ककोडी-चिचगडयथील नागरिकांनी केली आहे.

**चिचगड पोलिसस्टेशन नक्षलग्रस्त भागात असल्याने रात्रीची गस्ती करन्यास पोलिस कर्मचाऱ्यांना मनाई केलेली आहे. तरी आम्हाला तक्रार आली की त्या तक्रारीची दखल घेत कारवाई करण्यात येते.**
**अजय भुसारी (ठाणेदार चिचगड)**



**विशेष म्हणजे काही दिवसापुर्वी** ककोडी-वरुन चिचगड मार्गे येणा-या सहा चाकी वाहनात जनावर कोबुंन नेतांना बंजरगं दलाने सकाळच्या सुमारास वाहन पकडून चिचगड पोलिसांच्या ताब्यात दिले होते.

# राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ६०६ प्रकरणे निकाली

**गोंदिया :** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबीत असलेले खटले समोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली निघावी यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.ए.ए.आर.औटी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एम.बी.दुधे यांचे मार्गदर्शनाखाली ७ मे रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समि त्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकारच्या तडजोडपात्र न्याय प्रविष्ठ व पुर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्ह्यातील एकूण न्यायालयात प्रलंबीत दिवाणी ३३१ प्रकरणांपैकी ४४ प्रकरणे निकाली काढण्यात आली व १,२६,८८,१५५ रुपयांची वसुली करण्यात आली. न्यायालयात प्रलंबीत १६२३ फौजदारी प्रकरणांपैकी १८३ प्रकरणे निकाली काढण्यात आली व १,१९,८३,३१८ रुपयांची वसुली करण्यात आली. तसेच पुर्वन्यायप्रविष्ठ ७८३२ प्रकरणांपैकी ३७९ प्रकरणे निकाली काढण्यात आली व २४,५९,९०७ रुपयांची वसुली करण्यात आली. असे एकूण ९७८६ ठेवलेल्या प्रकरणांपैकी ६०६ प्रकरणांचा यशस्वीपणे निपटारा करण्यात आला व दोन कोटी ऐक्कात्तर




लाख एक्कतीस हजार तिनशे अंशी रुपयांची वसुली करण्यात आली. त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव अंतर्गत जिल्ह्यातील न्यायालयामध्ये एकूण ५५५ फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ४९८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे बऱ्याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे सदर लोकअदालतीच्या माध्यमातून समाजातील उपेक्षीत घटकांकरीता सामाजिक कार्य करणारे मांग, गारुडी समाजातील सामाजिक कार्यकर्ते यांना लोक अदालतीच्या पॅनलवर पॅनल सदस्य म्हणून घेण्यात आले होते.

विद्युत, पाणी, टेलिफोन यांचे पुर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधित विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

न्यायालयात प्रलंबीत असलेली प्रकरणे तसेच पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरीता गोंदिया येथे न्यायाधीश सर्वश्री एस.बी.पराते, ए.एम. खान, एन.बी.लवटे, एस.जे. भट्टाचार्य, एन.आर. वानखडे, एस.व्ही. पिंगळे, जे.एम.चौहाण, आर.डी. पुनसे, व्ही.आर. आसुदानी, एस.डी. वाघमारे, व्ही.के.पुरी, जी.डी. गुरनुले, श्रीमती डी.एस. उपाध्याय व जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सी.के. बडे उपस्थित होते. सदर लोकअदालतीचे यशस्वी आयोजनाकरीता प्रबंधक आर.जी. बोरीकर, अधीक्षक पी.पी.पांडे, सहाय्यक अधीक्षक एम.पी. पटले, ए.एम. गजापुरे, सचिन कठाणे, पी.एन. गजभिये, एस.डी. गेडाम, एल.पी. पारधी व बी.डब्ल्यू. पारधी यांनी परिश्रम घेतले.

## धानखरेदी ठप्प, तयारी करायची कशी

**गोंदिया:** जिल्ह्यात रब्बी हंगामातील धानाची कापन, बांधन, मळणीचे काम आटोक्यात आले आहे. परंतु, शासकीय आधारभूत खरेदी केंद्र अद्यापही सुरु झाली नाही. रब्बी हंगामातील धान पिकाची विक्री करून शेतकरी खरीप हंगामाच्या कामाला लागतात. मात्र, धान खरेदी केंद्र सुरू न झाल्याने खरीपाची तयारी करायची कशी? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

जिल्ह्यातील खरेदी-विक्री सेवा संस्था आदिवासी विकास महामंडाच्या धान खरेदी केंद्रावर रब्बी हंगामातील धान खरेदी विक्री अद्यापही सुरु झाली नाही. ३० एप्रिलपर्यंत आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी नोंदणी करावी, अशी सूचना शेतकऱ्यांना देण्यात आली होती. परंतु, आधारभूत धान खरेदी केंद्रावर कुठल्याही प्रकारची अद्याप नोंदणी करण्यात आली नाही. खरेदी विक्री सेवा संस्था व आदिवासी सहकारी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना धान खरेदी केंद्रावर मोजमाप करण्याकरिता सुरूकरावे, अशी मागणी उन्हाळी धान उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे. परंतु, मे महिन्याचा पहिला आठवडा लोटूनही जिल्ह्यातील धान खरेदी केंद्र सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे, शेतकऱ्यांसमोर खरिपाच्या तयारीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

खरीप हंगामातील धान खरेदीमुळे गोदाम आधीच हाऊसफुल्ल आहेत. व्यापाऱ्यांनी धानाची भरडाईसाठी उचल केली नसल्यामुळे गोदाम हाऊसफुल्ल आहेत. भरपाईच्या प्रश्नावरून व्यापारी व शासन यांच्यातील तिढा अद्याप सुटला नाही. याबाबत शासनस्तरावर बैठकीच्या पलीकडे कुठलेही पाऊल अद्यापही उचलण्यात आले नाही.

# पुरप्रवण गावांचा सूक्ष्म आराखडा तयार करा–जिल्हाधिकारी



■ संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी करा
■ पुरेसा धान्य व औषध साठा ठेवा
■ सर्व विभागांनी समन्वय ठेवावा
■ एसओपी अद्ययावत करा
■ नियंत्रण कक्ष स्थापन करा

**गोंदिया :** पावसाळा सुरू होण्यास खूप कमी कालावधी बाकी असून यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस होणार असल्याचा हवामान खात्याने अंदाज वर्तविला आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक विभागाने दक्ष राहणे आवश्यक असून जिल्ह्यातील पुरप्रवण गावांचा सूक्ष्म आराखडा तयार करावा अशा सूचना जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी यंत्रणांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळी त्या बोलत होत्या. अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

गोंदिया जिल्ह्यात ९६ गावे पुरप्रवण असून या गावात विशेष उपाययोजना असलेला आराखडा तयार करावा. या गावांसाठी पर्यायी मार्गांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी तात्काळ सादर करावी. मान्सून तसेच आपत्तीच्या वेळेस कार्य प्रणालीची कार्यपद्धती अद्ययावत करावी, असे त्यांनी सांगितले. १ जून पासून तालुकानिहाय नियंत्रण कक्ष स्थापन करून नियंत्रण कक्षात पूर्ण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे नगरपालिका व ग्रामपंचायत स्तरावर आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी. अनुभवी पोहणाऱ्या व्यक्तींची यादी सुद्धा अद्ययावत करण्यात यावी. या यादीत महसूल व पोलीस विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

धरणाचे पाणी सोडतांना गावकऱ्यांना पूर्व सूचना देण्यात यावी. त्यासाठी दवंडी, सोशल मिडिया आदींचा वापर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. आपल्या कार्यक्षेत्रात सुरक्षीत निवारा, समाजभवन, शाळा, मंगल कार्यालय, लॉन, मोठ्या इमारती इत्यादींची ओळख करुन त्या आरक्षीत करण्याबाबत कार्यवाही आताच करावी. विविध जलाशय, धरण, या ठिकाणी मान्सून कालावधीत सामान्य नागरिकांना जाण्यास प्रतिबंध करणारा आदेश निर्गमीत करावा असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

नदी, नाल्यामधील गाळ काढणे, सफाई व स्वच्छता तातडीने करून घ्यावी. नदी, नाल्याच्या काठावर अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीस देण्यात यावी. आपल्या जिल्ह्यात वैनगंगा व बाघ या महत्वाच्या नद्या असून या ठिकाणी संदेशवहन यंत्रणा अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नेमून दिलेली जबाबदारी प्रत्येक विभागाने पार पाडणे अनिवार्य असून मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी नियमीत संपर्क ठेवावा असे त्यांनी सांगितले. पूर ओसरल्यावर साथरोग वाढण्याची शक्यता असते, ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाने आताप–ासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक घ्यावी असे निर्देश दिले.

पावसाळ्यात बस वाहून गेली, कार वाहून गेली, नागरिक पुरात अडकले व रेल्वे रुळावर पाणी साचले अशा घटना प्रत्येक वर्षी घडत असतात. हा जुना अनुभव लक्षात घेता या घटना घडणार नाहीत यासाठीच्या उपाययोजना आतापासूनच कराव्यात असे अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी सांगितले. मागिल आपत्तीचा अनुभव व त्याचा अभ्यास करुन उपाययोजना कराव्या असे ते म्हणाले. पूर परिस्थितीच्या डोंगा उलटून जिवित हानी झाल्याच्या घटना घडतात ही बाब लक्षात घेता पुराच्या काळात डोंग्याला प्रतिबंध घालण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

सर्व यंत्रणांनी पूरपरिस्थिती व आपत्तीच्या काळात समन्वय ठेवून काम करावे तसेच दिलेल्या जबाबदारीचे गांभीर्याने पालन करावे असे निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी सांगितले. त्यांनी प्रत्येक विभागाला जबाबदारीचे वाटप करून दिले. प्रत्येक तालुका स्थळी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या सूचना दिल्या. संपर्क तुटणाऱ्या गावांना उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी भेटी देऊन नागरिकांना माहिती द्यावी असे त्यांनी सांगितले.

# टंचाईग्रस्त जिल्ह्याला टँकरमुक्तीचे स्टिकर



**गोंदिया:** गोंदिया जिल्ह्यात वर्षाला सरासरी १३०० मिमी पाऊस पडतो. अशी सरकारदरबारी नोंद आहे. मात्र गेल्या काही वर्षात जिल्ह्यातील पर्जन्यमान कमी होत चालले. पडणाऱ्या पावसाची साठवण होत नसल्यामुळे पाणी वाहून जावून भूगर्भातील पाण्याचा साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यातच उपसा जोमाने वाढल्यामुळे पारंपरिक पाण्याचे स्त्रोत कोरडे पडत आहेत.

गोंदिया जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात ३९८ गावे व १५३ वाड्यात पाणी टंचाई असल्याचे शासनाच्या दप्तरी नोंद आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील सुमारे साडेसहाशे गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी जिल्हा परिषदेने केलेल्या उपाययोजना फक्त कागदावरच आहे. तर राज्यात टँकरमुक्त जिल्हा म्हणून ओळख असलेल्या जिल्ह्यातही आता टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. अधिकारी फक्त आपली पाठ थोपटून घेण्याकरिता जिल्ह्यात पाणी टंचाई नसल्याचे भासवून शासनदरबारी आ–पली पाठ थोपटून घेण्याची आव आणत आहेत. याचे परिणाम मात्र नागरिकांना भोगावे लागत आहेत. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी २०१७–१८ या वर्षात दोन कोटी ३३ लाख ४९ हजार रुपयांचा निधी देण्यात आला होता. परंतु यातील २ कोटी १९ लाख ३६ हजार रुपये खर्च करण्यात आले होते. तर १४ लाख १३ हजार रुपये खर्च केलेच नाही. सन २०१८–१९ करीता महसूली क्षेत्रातील दुष्काळग्रस्त गावांचे वीज देयक अदा करण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला शासनाने ६२ लाख ३ हजार रुपये दिले होते. पाणी टंचाई ही फक्त कागदोपत्री करुन पैशाच्या पाणी मुरविला जातेय की काय अशा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

जिल्ह्यातील अनेक गा–वात पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. जिल्हा नियोजन समितीने यंदा जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ कामे करण्यासाठी निधी जिल्हा प्रशास–नाला उपलब्ध करुन दिला. मात्र जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे पाणी टंचाई निवारणार्थ कामे वेळेत सुरू झाली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना भर उन्हाळ्यात पाण्यासाठी दुरवर पायपीट करावी लागत आहे. एकंदरीत उन्हाळ्यापुर्वी पाणी टंचाई निवारणार्थ उपाय योजना राबविण्यात प्रशासन पूर्णपणे फेल झाले आहे.

# तिरोडा पंचायत समितीचा सम्मान



**तिरोडा:** मागील वर्षी पंतप्रधान आवास योजनेत उत्कृष्ट काम केल्याबाबत पंचायत समिती तिरोडाला सम्मानित करण्यात ओ. असून १ मे रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते खंडविकास अधिकारी यांना सम्मामचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले.

केंद्र शासनाच्या पंतप्रधान महाआवास योजनेत २०२१ मध्ये नागपूर विभागात उत्कृष्ट काम करुन तिरोडा पंचायत समितीने तृतीय क्रमांक पटकावला. त्यामुळे १ मे रोजी पालकमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यपालन अधिकारी अनिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पंचायत समिती तिरोडाचे खंडविकास अधिकारी सतीश लिल्हारे यांना सम्मानचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. याप्रसंगी पुरस्कार स्विकारताना खंडविकास अधिकारी सतीश लिल्हारे यांच्यासह विस्तार अधिकारी अनुप भावे, अनिल आदमने, के.डी. मलेवार यांनी पुरस्कार स्विकारला.

# ग्रामीण भागाच्या विकासासाठी २.३५ कोटींच्या कामांना मान्यता

## खा.प्रफुल पटेल यांच्या पाठपुराव्याला यश



**गोंदिया :** गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबध्द असलेल्या खा.प्रफुल पटेल यांनी शृंखलाबध्द विकासकामांना गती देण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुरूप राज्य शासनाकडे ग्रामीण भागातील गावातंर्गत मुलभूत सुविधांच्या विकासकामांना मंजूरी देण्यात यावी, यासाठी माजी आमदार राजेंद्र जैन यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला. यामुळे राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाने ६ मे रोजी शासन निर्णय निर्गमित करून गोंदिया जिल्ह्यातील एकूण ४७ विकासकामांसाठी २ कोटी ३५ लाखाच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते व इतर मुलभूत सुविधांच्या कामांना लवकरच सुरूवात होणार आहे. खा.प्रफुल पटेल यांच्या पाठपुराव्याने निधी मिळाल्याने जिल्हावासीयांनी त्यांचे आभार मानले.

गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्याशी आपुलकी जोप–ासात सातत्याने खा.प्रफुल पटेल सर्वसामान्य नागरिकांशी संपर्कात राहतात. त्यातल्यात्यात कोरोना संसर्गाच्या काळातही या दोन्ही जिल्ह्यांना वाऱ्यावर न सोडता सतत ते मदतीसाठी अग्रेसर राहिले.

एवढेच नव्हेतर ग्रामीण भागा–तील प्रत्येक गावापर्यंत पोहोचून नागरिकांशी संवाद साधण्याचे काम ही त्यांनी सातत्याने सुरू ठेवले. त्याचप्रमाणे माजी आमदार राजेंद्र जैन यांनी जिल्ह्यातील समस्या खा.प्रफुल पटेल यांच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान ग्रामीण भागांच्या विकासासाठी खा.प्रफुल पटेल यांनी ग्रामीण विकास मंत्रालयाशी पाठपुरावा केला.

गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांसह मुलभूत सोयी–सुविधांच्या मंजुरीसाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे ग्राम विकास मंत्रालयाने ६ मे रोजी शासन निर्णय निर्गमित करून एकूण ४७ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. यासाठी २ कोटी ३५ लाख रूपयाचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळातंर्गत मंजूर कामांना पूर्ण करण्यात यावे, असे निर्देशही देण्यात आले आहे. खा.प्रफुल पटेल यांच्या प्रयत्नामुळे गोंदिया जिल्ह्यात विकासात आणखी भर पडणार आहे. यामुळे त्यांचे जिल्हावासीयांकडून आभार मानले जात आहे.

### ४७ विकासकामांचा समावेश

**ग्रामविकास मंत्रालयाकडून ६ मे रोजी शासन निर्णय निर्गमित करून ग्रामीण भागातील गावातंर्गत मुलभूत सुविधा पुरविणे लेखाशिर्षक २५१५ १२३८ या योजनेतंर्गत गोंदिया जिल्ह्यात ४७ कामांना मंजूरी प्रदान केली आहे. यामध्ये दोन सभागृह बांधकाम, एक रस्ता पुल, दोन आवारभिंत, एक श्मशानभुमी सौंदयीकरण, एक नाली बांधकाम, दोन बौध्द विहार सौंदयीकरण व ३८ रस्ता सिमेंटीकरणाच्या कामांचा समावेश आहे. मंजुरी प्रदान झालेल्या कामांमध्ये गोंदिया तालुक्यात १७, तिरोडा तालुक्यात ७, सडक अर्जुनी तालुक्यात ४, अर्जुनी मोरगाव ३, आमगाव ९, गोरेगाव ६ व सालेकसा तालुक्यातील एका कामाचा समावेश आहे.**

### महिला लोकशाही दिन १७ मे रोजी

**गोंदिया :** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी मंगळवारी १७ मे रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

# राज्य सरकारच्या चुकीने ओबीसी आरक्षण गेले




**नागपूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींच्या २७ टक्के आरक्षणाची शिफारस करणाऱ्या अंतरिम अहवालाची अंमलबजाणी करू नये आणि ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घ्याव्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यावरून ओबीसी नेते, ओबीसी संघटनांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

राज्य सरकारच्या चुकीने ओबीसी आरक्षण गेले. ४ मार्च २०२१ ला विकास गवळी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ट्रिपल टेस्ट सांगितले होते. सरकारने २९ जून २०२१ रोजी आयोग स्थापन केला, परंतु आयोगाने कोणताही डाटा गोळा केला नाही. पुढे राजेश कुल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ७ मार्च २०२२ ला आदेश दिले. त्यानुसार राजकीय आरक्षणाचा डाटा सादर करावयाचा होता. तेव्हा राज्य सरकारने आयोगाला शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीचा डाटा दिला. परंतु राजकीय आरक्षणाचा डाटा दिला नाही. तेव्हा न्यायालयाने पुन्हा सरकारला फटकारले. १०५ नगरपंचायत निवडणुका ओबीसी आरक्षणाविना झाल्या होत्या. नंतर सरकारने मध्यप्रदेशच्या धतीवर एक अध्यादेश काढला, परंतु तोही सर्वोच्च न्यायालयात टिकला नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षण विना होणार आहेत, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सरचिटणीस सचिन राजुरकर म्हणाले.

ओबीसी आरक्षण वाचवण्यात राज्य सरकार सपशेल अपयशी ठरले. आरक्षणाशिवाय निवडणुका घेण्याला भाजप सहमत नाही. मात्र राज्य सरकारने याकडे जाणीवपूर्वक व हेतू पुरस्सर दुर्लक्ष केले असून कुठेतरी ओबीसींना डावलण्याचे कटकारस्थान आघाडीतील पक्षांनी केले आहे, असा आरोप भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

ओबीसी राजकीय आरक्षणाबाबतची समज व स्पष्ट भूमिकेच्या अभावामुळे सरकारकडून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न होत राहिला आणि सरतेशेवटी हा परिणाम घडला. ओबीसींच्या स्थानिक स्वराज्य संस्था आरक्षणाबाबत भूमिका व आधाराची सरकारकडे ठोस समजच नसल्याने पहिल्याच मांडणीत पाटी कोरी राहिली. त्यानंतर तर वेळ वाया जात राहिला. निवडणूक ही एक निश्चित प्रक्रिया आहे. तर आरक्षणाचा विषय पडताळणी, अभ्यासाचा आहे, असे मत राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे मुख्य संयोजक नितीन चौधरी यांनी व्यक्त केले.

आमदार कृष्णा खोपडे यांनी केला. महाविकास आघाडी सरकारचे वकील ओबीसी समाजाची बाजू सर्वोच्च न्यायालयात सक्षमपणे मांडू शकले नाही. आजच्या निकालामुळे ओबीसी समाजावर प्रचंड मोठा अन्याय झाला आहे, अशी खंत

# विभागीय समितीने केली कटंगीची तपासणी



**गोरेगाव:** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान २०१८–१९ कार्य मूल्यांकन यावर आधारित स्पर्धात्मक वर्ष २०२९–२० यामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत कटंगी बुजुकचे विभागीय स्तराचे मूल्यमापन नागपूर विभाग तपासणी समितीद्वारे करण्यात आले. या तपासणी समितीचे अध्यक्ष नागपूर विभाग उपायुक्त (विकास) विवेक इलमे होते. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप अभियंता मदनकर, सहायक आयुक्त (विकास) देवानंद पाणबुडे, जल जीवन मिशन विभागीय संनियंत्रक रमेश बागडे, विस्तार अधिकारी (पंचायत) छत्रपाल पटले व सर्व सदस्य उपस्थित होते. विभागीय तपासणी समितीच्या नियोजित दौराप्रसंगी ग्रामपंचायत कटंगी बुदुकद्वारा गावाच्या पश्चिम प्रवेशद्वारावर समितीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात समितीने सर्व विभागांचा आाढवा घेतला.

तसेच गाव भ्रमण करुन ग्रामस्तरावरील विविध कामांची पाहणी केली. जिल्हा परिषद शाळा कटंगी येथे भेट देऊन शाळेचे परिसर तपासणी व विविध उपक्रमांची माहिती घेतली. घनकचरा व्यवस्थापन या ठिकाणी भेट देऊन कार्यप्रणाली जाणून घेतली. एकंदर स्वच्छता अभियान अंतर्गत राबविलेले स्वच्छता कार्य, जलव्यवस्थापन, शालेय कार्य, अंगणवाडी व आरोग्य विभागाचे कार्य याबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी प्रामुख्याने सरपंच तेजेंद्र हरिणखेडे, उपसरपंच भीमराज टेंभुर्णीकर, ग्रामपंचायत सदस्य भुमेश्वरा मौजे, प्रमिला हरिणखेडे, प्रेमलाल भगत, चंद्रकला रहांगडाले, चंद्रकला नेवारे, सु–नील भोयर, बेनीराम चौरागडे, वैशाली शहारे, झामसिंग टेंभरे, जि.प. सदस्य शैलुश नंदेश्वर, हेमेंद्र रहांगडाले, पोलीस पाटील हेतराम हरिणखेडे, तंमुस अध्यक्ष हि.सु. हरिणखेडे, ग्रामसेवक अरविंद साखरे, मुख्याध्यापिका शीला राऊत, डी.संजय रहांगडाले, सिस्टर स्वप्नाली ठवकर व गावकरी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी व सीईओंनी केली बबई व बाम्हणी येथील रस्ता कामाची पाहणी



**गोरेगाव :** तालुक्यातील बाम्हणी व बबई येथे मातोश्री पांदण रस्ता योजनेंतर्गत सुरु असलेल्या कामाची पाहणी जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी आज ९ मे रोजी केली. ग्रामपंचायत बाम्हणी येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या नाला सरळीकरण व इतर कामांची पाहणी केली.तर बबई येथे पांदण रस्त्याची पाहणी करुन मजुरांशी सवांद साधला.

यावेळी बाम्हणी सरपंच गीताताई बिसेन, बबई सरपंच सोमेश रहागंडाले, गटविकास अधिकारी उइके, तहसलिदार गोस्वामी, विस्तार अधिकारी टी.एन. बिसेन, तलाठी एस. टी. अंबादे, का.अ. बघेले, हरीश जि कटरे, ग्रामसेवक टेंभरे व ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.

### चिचगड आदि. सेवा सहकारी संस्थेवर किसान एकता पॅनलचा विजय



**चिचगड:** चिचगड येथील आदिवासी विविध कार्यकारी संस्थेच्या झालेल्या निवडणुकीत किसान एकता पॅनलचे १३ उम्मीदवार निवडून आले. तर संघर्ष पॅनलच्या उमेदवारांचा पराभव झाला.

निवडून आलेल्या उमेदवारात संतराम केजाऊजी भोयर, अनिल मारुती गावळ, शोभाराम दामा गावळ, बळीराम मनीराम धानगुन, सामसाय रतनसिंग नेताम, संतोष गोविंदा वाढई, अशोक सोमा झिंगरे, गणेश वातु देशमुख, सावंत रामरतनबापू राऊत, भुवनलाल रघुसाव नरवरे, नूपराज सोपाजी तिरगम, सौ.नीताबाई बालाराम कुंजाम, लक्ष्मीबाई छगन कोल्हारे यांचा समावेश आहे.

# शिकारीमुळे वन्यप्राण्यांचा जीव टांगणीला



**गोंदिया:** केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने १४ नोव्हेंबर २०१४ मध्ये वन्यजीवांच्या शिकारी, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार बघता राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरिता पूर्णवेळ समर्पित असे वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही. परिणामी वन्यजीव धोक्यात आले आहे.

भारतीय वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत भार–तातील सगळ्या वन्यजीवांना सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे. मात्र वन्यजीवांच्या शिकारी, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार पाहता यावर राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे. सद्यस्थितीत कार्यान्वित प्रशासकीय यंत्रणेमध्ये कमतरता असल्याने वन्यजीव अपराध नियंत्रण प्रभावीपणे करणे शक्य नाही. त्यामुळे वन्यजीवांच्या शिकार, अवैध व्यापार व अपराधांची वाढती संख्या, आंतरराष्ट्रीय शिकाऱ्यांच्या सक्रिय टोळ्या व होणारे व्यापार पाहता राज्य पातळीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरिता राज्यांनी पूर्णवेळ समर्पित असणारे वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो स्थापन करण्याचे निर्देश केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिले होते.

ही सुचना करुन तब्बल सहा वर्षांचा काळ लोटला असताना देखील राज्यात त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. परिणामी वन्यजीव धोक्यात आले आहे. सध्या वाढते वन्यजीव अपराध नियंत्रीत करण्यासाठी वन विभागाकडे वन व पोलीस यंत्रणा एकत्रीत करणारी एकसंघ व्यवस्था नाही. तसेच वन व पोलीस विभाग या वेगवेगळ्या प्रशासकीय यंत्रणा असल्याने एकत्रित कामकाज करायला बऱ्याच मर्यादा आहेत. त्यामुळे संसाधनांची सुसज्ज व परिपूर्ण असलेली स्वतंत्र यंत्रणा स्थापन करणे अनिवार्य आहे. जिल्ह्यात अलिकडच्या काळात अनेक शिकार झाल्या. त्यात पट्टेदार वाघ, बिबट, रानगवे, हरीण यांचा समावेश आहे. अनेक प्रकरणात वन्यजीव आणि वनविभागाने आरोपींचा शोध देखील लावला. परंतु कित्येक प्रकरणात वनविभागाला आर–ोपींचा शोध घेण्यात अपयश आले. आधीच कामाचा व्याप अधिक असल्यामुळे या प्रकारावर अंकुश लावण्यात विभागाला अपयश येत आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय कटंगी(बु.)
## पंचायत समिती गोरेगाव
## ई-निविदा

निविदा क्रं. १ दिनांक :–०९/०५/२०२२

ग्रामपंचायत कार्यालय कटंगी (बु.) पंचायत समिती गोरेगाव येथिल सन २०२२–२३ मध्ये विविध कामे/विकास कामाकरीता तसेच म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत होणाऱ्या कामाकरिता लागणारेसाहीत्य पुरवठा करण्या करिता ई–निविदा पध्द तीने निविदा मागण्याचत येत आहे. सदर ई–निविदा ची विस्तुत माहीती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध असुन विस्तुंत माहिती ग्रा.पं. कार्यालयात उपलब्ध आहे.

**ई–निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | ई–निविदा प्रसिध्दील व दाखल दिनांक | दिनांक ०९/०५/२०२२ पासुन |
| २ | ई–निविदा अंतिम दिनांक | दिनांक १३/०५/२०२२ ला. ५.०० वा. पर्यत |
| ३ | ई–निविदा उघण्याची दिनांक | दिनांक १४/०५/२०२२ ला १०. ०० वा. शक्य झाल्यास |

विस्तृत माहीती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागु राहतील.

**सरपंच** ग्रमपंचायत कार्यालय कटंगी(बु.)

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत कार्यालय कटंगी(बु.)

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.११ मे २०२२ ४

# अंडरग्राऊंड व नव्या पूलावर वाहतुक कोंडी



**गोंदिया :** शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुना उड्डाण पूर्ण जीर्ण झाल्याने या पुलावरून वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली. तर नवीन पुलाच्या सदोष बांधकामामुळे यावरून वाहतूक धोक्याची झाली आहे.परिणामी पुलाच्या दोन्ही बाजूला राहणाऱ्या नागरिकांना सध्या अंडरग्राउंड परिसरातून वाहतूक करावी लागत आहे.हे पण हा मार्ग आधीच अरुंद असल्याने या ठिकाणी दिवसभरातून अनेकदा वाहतुकीची कोंडी होत आहे.

गोंदिया-बालाघाट मार्गावर १९५२ साली उड्डाणपूल तयार करण्यात आला होता.मात्र, हा उड्डाणपूल जीर्ण झाला असून त्यावरून वाहतूक सुरू ठेवणे धोक्याचे ठरू शकते या संबंधीचे पत्र रेल्वेने जिल्हा प्रशासनाने दिला.त्यानंतर जिल्हा प्रशासनाने गुरुवारपासून (दि .५) हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी दोन्ही बाजूने बंद केला.जुना उड्डाणपूल तोडण्याच्या कामाला देखील सुरुवात केली. तब्बल ७० वर्षांच्या कालावधी नंतर हा पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद झाला. जुना जीर्ण उड्डाणपूल पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने मुंबई येथील मत्ते असोसिएट या कंपनीला काम दिले आहे.

रेल्वे विभाग आणि शासनाने दिलेल्या डेडलाईननुसार हा पूल सहा महिन्यांच्या कालावधीत पाडायचा होता.मात्र,या पैकी दोन महिन्यांचा कालावधी निघून गेल्याने आता चार महिन्यांतच पूल पाडण्याचे काम पूर्ण करावे लागणार आहे. हा पूल पूर्णपणे पाडून झाल्या नंतर या ठिकाणी १२५ कोटी रुपये खर्चून नवीन उड्डाणपुलाचे काम सुरू केले जाणार आहे. तेव्हा या पुलाच्या बांधकामासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. आता तब्बल ७० वर्षांनंतर हा पूल तोडण्यात येणार आहे. त्यासाठी ६ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

हा पूल वाहतुकी साठी दोन्ही बाजूने पूर्णपणे बंद केला. त्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूला राहणाऱ्या नागरिकांची कोंडी झाली आहे. नवीन उड्डाणपुला वरून येण्यासाठी बराच फेरा मारून यावे लागते, तर या पुलावरून पायी ये-जा करण्यासाठी पादचारी पुलाची व्यवस्था नसल्याने त्यावरून जाणे म्हणजे जीव धोक्यात टाकण्यासारखे आहे. त्यामुळे नागरिक अंडरग्राउंड मार्गाचा मागील तीन-चार दिवसांपासून सर्वाधिक वापर करीत आहे. पण या मार्गावर सुद्धा रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. परिणामी या ठिकाणी अपघाताची शक्यता अधिक बळावली आहे. शहरातील अंडरग्राउंड परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते.या रस्त्यावर गुडघाभर पाणी साचून राहते. त्यामुळे बरेचदा हा मार्ग बंद असतो. त्यामुळे सध्या या मार्गाने सुरू असलेली वाहतूक कोणत्या मार्गाने करायची? असा प्रश्न आहे, तर नवीन उड्डाणपुला वर सुद्धा यामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.




# तीन नगर परिषदांचा प्रभाग रचनेच्या कार्यक्रमाला पुन्हा वेग

**गोंदिया:** राज्य निवडणूक आयोगाने एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुसंगाने प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला. मात्र, प्रभाग रचनेचे अधिकार राज्य शासनाने आपल्याकडे राखून ठेवले होते. यात सवीच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त सुधार अधिनियमातंर्गत स्थगीत केलेल्या कार्यक्रमाला पुढे सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुरूप गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा व आमगाव या तीन नगर पंचायतीच्या प्रभाग रचना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली आहे. कार्यक्रमानुसार ७ जूनपर्यंत अंतिम अधिसुचना जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रसिध्द करण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सवीच्च न्यायालयाच्या निर्णयानुरूप ६ मे रोजी राज्यातील माहे-एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत संपलेल्या व नवनिर्मित अशा एकूण २०७ नगर परिषदांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाला गती देण्याच्या अनुसंगाने पाऊल उचलले आहे. यामध्ये अ वगातील १६, ब वर्गातील ६७ तर क वगातील १२० व नवनिर्मित ४ नगर परिषदांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या सुचनेनुरूप स्थगीती देण्यात आलेल्या प्रभाग रचनेच्या कार्यक्रमाला पुन्हा वेग देण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहे. त्या अनसुंगाने निवडणूक आयोगाने गोंदिया जिल्ह्यातील तीन नगर परिषदांसह एकूण २०७ नगर परिषदेच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहिर केलेला आहे. यानुसार हरकती व सुचना मागविण्याचा कालावधी १० ते १४ मेपर्यंत, सुचना व हरकतीवर सुनावणी २३ मे, त्यावरील अभिप्राय अहवाल सादर करणे ३० मे व अंतिम प्रभाग रचनेला ६ जूनपर्यंत मान्यता देण्यात येणार आहे. तसेच अंतिम प्रभाग रचनेची अधिसुचना प्रसिध्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी किंवा नगर परिषदेकडून ७ जून २०२२ पर्यंत प्रसिध्द करण्यात येणार आहे. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा व आमगाव या तिन्ही नगर परिषद कार्यालयात प्रभाग रचनेच्या कामांना गती मिळणार आहे. तर दुसरीकडे स्थगीत असलेल्या प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे सुस्त बसलेले इच्छूक पुन्हा कामाला लागले आहेत.

# १०६ गावांना मिळणार पिण्याचे शुद्ध पाणी

- २२७ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी
- आ. अग्रवाल यांचा पाठपुरावा

**गोंदिया:** तालुक्यातील १०६ गावांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे, यासाठी आ. विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नाला यश मिळाले आहे. राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने २२७ कोटी रुपयांच्या कामांना २७ एप्रिल रोजी मंजुरी देण्यात दिली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना घरोघरी नळजोडणी व प्रत्येक घरात शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे हा आ.अग्रवाल यांचा संकल्प आहे. दोन दशकांहून अधिक काळापासूनसू पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या संकटात सापडलेल्या गावांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे, यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत आहेत.



त्यांच्या प्रयत्नामुळे शासनाने तालुक्यातील १०६ गावांसाठी २२७ कोटीच्या महत्वाकांक्षी योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेतंर्गत गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी धापेवाडा सिंचन योजनेतून स्वतंत्र पाइपलाइन टाकण्यात येणार आहे. या योजनेतंर्गतर्ग तालुक्यातील फुलचूर, फुलचूर टोला, पिंडकेपार, नंगपुरा पुरी, कारंजा, डांगोली, दासगाव खुर्द, दासगाव बुजु , गिरोला, लोहारा, निलज, पांढराबोडी, कामठा, रावणवाडी, सावरी, परसवाडा, शिरपूरपूटोला, मुंडीपार, आसमंत (आ.) आदासी, खमारी, तुमखेडा खुर्द, चुलोद, टेमणी, मुंडीपार, ढाकणी, बटाणा, एकोडी, घिवरी, डोंगरगाव, हिवरा, मजितपूर, तेधवा, गर्रा बु., नागरा, चुटिया, बघोली, गंगाझरी, मुरपार या गावातील सध्या १ लाख ५५ हजार लोकसंख्येला याचा लाभ होणार असून या योजनेंतर्गतर्ग प्रतिव्यक्ती प्रतिदिन ५५ लिटर शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

# भंडारा जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजप दुभंगली





**भंडारा-** भंडारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी आज झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष दुभंगल्या गेल्याने भाजपच्या वरिष्ठांनी रचलेला डाव माजी आमदारानेच हाणून पाडत जिल्हा परिषद अध्यक्षपदी काँग्रेस उमेदवाराला विजयी केले.तर उपाध्यक्षपदावर वाघमारे गटाचे टाले विजयी झाले.तर या निवड़णुकीत भाजपने केलेली राष्ट्रवादीसोबतच युती पराभवाच्या छायेत गेली.

१२ सदस्य असलेल्या भाजपचे ५ सदस्य हे माजी आमदार चरण वाघमारे यांच्या गटाचे असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला समर्थन देण्याऐवजी काँग्रेसला समर्थन दिले.

राजकीय समीकरण समोर आले.त्यातच भाजप राष्ट्रवादीच्या युतीला फटका बसला आहे.माजी आमदार चरण वाघमारे यांच्या विकास फाऊंडेशनच्या नावाने ५ जिल्हा परिषद सदस्याने जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पदासाठी कोंढा (पवनी) जिल्हा परिषद क्षेत्राचे काँग्रेसचे उमेदवार गंगाधर जिभकाटे यांना पाठिंबा दिला.तर काँग्रेसने उपाध्यक्ष पदासाठी गर्रा बघेडा (तुमसर) जिल्हा परिषद क्षेत्राचे चरण वाघमारे गटाचे सदस्य संदीप टाले यांना समर्थन दिले.

तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्ष अविनाश ब्राम्हणकर व उपाध्यक्ष पदासाठी भाजपकडून प्रियाक बोरकर रिंगणात होते.काँग्रेस व वाघमारेंच्या युतीला २७ मते तर राकाँ भाजप युतीला २५ मते अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडणुकीत मिळाली. जिल्हा परिषदेमध्ये ५२ सदस्य आहेत. त्यामध्ये भाजप १२, राष्ट्रवादी काँग्रेस १३, काँग्रेस २१, अपक्ष ३, शिवसेना १, वंचित १, बिसपी १ असे बलाबल होते. काँग्रेस २१ जागा जिंकत मोठा पक्ष बनला आहे. विशेष म्हणजे मैजिक फिगर पासून काँग्रेस दूर असल्याने सत्ता स्थापनेसाठी माजी आमदार वाघमारेंच्या गटाशी हातमिळवणी करीत स्थापनेचा मार्ग मोकळा करीत राष्ट्रवादी भाजपच्या नेत्यांनी रचलेला डाव हाणून पाडला.

## जिल्ह्यात शुन्य कोरोना बाधित

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून १० मे रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या शुन्य आहे. आजपर्यंत ४६,२१६ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. ४५,४९४ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली. आतापर्यंत जिल्ह्यातील ५८८ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.४४ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२७ टक्के आहे तर डब्लिंग रेट **४५१.५ दिवस आहे.**







# भाजप ५, कॉंग्रेस १, चाबी १ व वंचितकडे १ पंचायत समिती



**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील ८ पंचायत समितींच्या सभापती व उपसभापतीपदासाठी आज ६ मे रोजी झालेल्या निवडणुकीत जिल्ह्याचे लक्ष असलेल्या गोंदिया पंचायत समितीमध्ये मात्र भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यात राष्ट्रवादी काँग्रेस व जनता की पार्टी (चाबी सघंटना) ला यश आले. निवडणुक अधिकारी उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील व गटविकास अधिकारी खोटेले यांनी निवडणुक प्रकिया पार पाडली.

गोंदिया पंचायत समिती सभापती उपसभापती निवडणुकीच्या माध्यमातून जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणूकीचे समीकरण स्पष्ट झाले असून चाबी संघटना ही महाविकास आघाडीसोबत जाणार हे निश्चित झाले आहे. गोंदिया पंचायत समितीमध्ये २८ सदस्य संख्या असून चाबी संघटना १०, भाजप १०, राष्ट्रवादी ५ व अपक्ष ३ असे आहे. सभापतीपदी चाबी संघटनेचे मुनेश रहांगडाले व उपसभापतीपदावर राष्ट्रवादी काँग्रेसचे निरज उपवंशी निवडून आले. चाबी संघटनेचे मुनेश रहांगडाले यांना १८ तर भाजपचे योगराज उपराडे १० मते मिळाली, उपराडे यांचा ८ मतांनी पराभव केला. तर उपसभापती पदाच्या निवडणुकीत निरज उपवंशी यांनीही भाजपचे विनोद बिसेन यांचा ८ मतांनी पराभव केला. विजयी पदाधिकारी यांचे आमदार विनोद अग्रवाल, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेंद्र जैन, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, छोटु पटले, शैलेष वासनिक, केतन तुरकर, माजी उपाध्यक्ष शिव शर्मा, कमलेश सोनवने, घनश्याम पानतवणे, मुकेश हलमारे, बेबी अग्रवाल, विक्की बघेले, छत्रपाल तुरकर, शैलजा सोनवने आर्दीनी अभिनंदन केले.




## सडक अर्जुनी पंचायत समितीवर भाजपची सत्ता, सभापतीपदी संगीता खोब्रागडे



**सडक अर्जुनी:** सडक अर्जुनी पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीपदाकरीता झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या सौ.संगीता खोब्रागडे सभापती तर शालीदंर कापगते यांची उपसभापदी पदावर बिनविरोध निवड झाली. भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने ही निवडणुक बिनविरोध पार पडली. निवडणुक अधिकारी तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी निवडणुकीची प्रकिया पार पाडली. पंचायत समितीच्या एकूण १० सदस्यांपैकी ७ सदस्य भाजपचे आहेत. तर दोन राष्ट्रवादी काँग्रेस व एक काँग्रेसची सदस्य संख्या आहे. यामुळे या पंचायत समितीमध्ये भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने भाजपची सत्ता काबिज करण्यास कोणतीही अडचण निर्माण झाली नाही. निवडणुकीनंतर सभापतींनी पदग्रहण केले, त्याप्रसंगी उपस्थित भाजप नेत्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी भाजप तालुका अध्यक्ष अशोक लंजे, जीवन लंजे, लक्ष्मीकांत धानगाये, हर्ष मोदी, माजी जि.प. सदस्य मिलन राऊत,पंचायत समिती सदस्य चेतन वडगाये, विलास बागडकर, गौरेश बावनकर, सुनील भिवगडे, पदमा परतेकी, तथा भारतीय जनता पार्टी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## अर्जुनी-मोर पंचायत समिती सभापतीपदी वंचितच्या सौ.कोडापे तर उपसभापती पदी अपक्ष पुस्तोडे विजयी



**अर्जुनी-मोरगाव:** अर्जुनी-मोरगाव पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीपदाकरीता आज ६ मे रोजी झालेल्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या सविता कोडापे व उपसभापतीपदावर अपक्ष होमराज पुस्तोडे यांना भारतीय जनता पक्षाने समर्थन देत काँग्रेस राष्ट्रवादीला सत्तेपासून दूर ठेवण्यात यश मिळविले. मात्र या यशाच्या माध्यमातूनच वंचित व अपक्ष उमेदवाराच्या माध्यमातून भाजपने पंचायत समितीची सत्ता ताब्यात ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्याची चर्चा सुरु झाली आहे. भाजपकडे सहा सदस्य असतानाही यापैकी कुणालाही उपसभापतीपद न देता अपक्षाला संधी देणे म्हणजे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही अपक्षांना आम्ही सामावून घेणार असल्याचे संकेत यामाध्यमातून भाजपने दिले आहे.

अर्जुनी मोर पंचायत समितीमध्ये १४ सदस्य संख्या असून यात भाजपचे ६, काँग्रेस ४,राकाँ २, वंचित १ व अपक्ष १ सदस्य निवडून आले होते. त्यात सभापतीपद हे अनुसूचित जमाती महिलाकरीता राखीव असल्याने व भाजपकडे उमेदवार नसल्याने भाजपने वंचित आघाडीच्या उमेदवाराला समर्थन दिले. तसेच भाजपकडून बंडखोरी करीत अपक्ष निवडून आलेले होमराज पुस्तोडेंना उपसभापतीपद देत सत्ता आपल्याच हाती राहील असे नियोजन केले. यात काँग्रेस व राष्ट्रवादीने आघाडी केली होती. सभापतीपदासाठी वंचितच्या सविता कोडापे यांच्याविरुध्द काँग्रेसच्या भागेश्वरी सयाम रिंगणात होत्या.यात कोडापे यांना ८ तर सयाम यांना ६ मते मिळाली. उपसभापती पदाच्या निवडणुकीत अपक्ष पुस्तोडे याना ८ व राष्ट्वादीच्या पुष्पलता दुरुगकर यांना ६ मते मिळाली. निवडणुकीनंतर नवनियुक्त सभापती व उपसभापती यांनी अर्जुनी-मोर पंचायत समिती क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. निवडणुक अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. विजय कुमार सूर्यवंशी, तहसीलदार विनोद मेश्राम, गट विकास अधिकारी विलास निमजे, विस्तार अधिकारी पंचायत राजकुमार ब्राह्मणकर यांनी काम पाहिले.

## गोरेगाव व तिरोडा पंचायत समितीवर भाजपची सत्ता




**तिरोडा/गोरेगाव : तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ राहांगडाले यांच्या नेतृत्वात गोरेगाव व तिरोडा पंचायत समितीच्या सभापती उपसभापती निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवली असून तिरोडा पंचायत समिती सभापतीपदी कुंता रामप्रकाश पटले व उपसभापतीपदी हुपराज रामजी जमईवार तसेच गोरेगाव पंचायत समितीच्या सभापतीपदी इंजि.मनोज शामलाल बोपचे व उपसभापती पदी राजकुमार रामविलास यादव यांची बिनविरोध निवड झाली. तिरोडा आणि गोरेगाव दोन्ही पंचायत समितीवर भाजपने झेंडा फडकवला.**

**तिरोडा पंचायत समितीमध्ये १४ पैकी ९ सदस्य संख्या असलेल्या भाजपकडे स्पष्ट बहुमत आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादीकडे ३, काँग्रेसकडे १ व प्रहार संघटनेकडे १ अशी सदस्य संख्या आहे. तर गोरेगाव पंचायत समितीमध्ये एकूण १२ पैकी १० सदस्य संख्या भाजपकडे असल्याने एकहाती सत्ता स्थापित केली. संपूर्ण तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्रात आमदार विजय रहांगडाले यांच्या कार्य करण्याच्या शैलीवर जनतेने विश्वास ठेवत भाजपाच्या उम्मेदवारांना विजयी केले. दोन्ही पंचायत समितीमध्ये झालेल्या सभापती पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली.नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आमदार विजय रहांगडाले, तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, डॉ.साहेबलाल कटरे व पक्ष पदाधिकारी यांचे आभार मानले.**

## सालेकसा पं.स.वर कॉंग्रेस



**सालेकसा पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदासाठी आज झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला स्पष्ट बहुमत असल्याने दोन्ही पदाच्या नियुक्तीसाठी कोणतीही अडचण आली नाही. सभापतीपदी सौ. प्रमिला गणवीर व उपसभापती पदी संतोष बोहरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या पंचायत समितीमध्ये एकूण ८ पैकी ६ सदस्य संख्या काँग्रेसकडे आहे. भाजपकडे दोन सदस्य संख्या आहे. परिणामी काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असल्याने बिनविरोधच सत्ता काबीज केली. विशेष म्हणजे सतत दुसऱ्यांदा काँग्रेस पक्षाने सालेकसा प.स. च्या सत्तेवर आपला कब्जा कायम ठेवला. यात आमदार सहषराम कोरोटे यांचा मोलाचा वाटा असल्याचे बोलले जात आहे. तर हा विजय पक्षातील तळा-गळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विजय आहे, असे बोलत आमदार सहषराम कोरोटे यांनी तालुक्यातील सर्व नेते व कार्यकर्ते मंडळींचा अभिनंदन केलेला आहे.**

## आमगाव पंसवर भाजपचा झेंडा



**आमगाव पंसच्या सभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपचे राजेंद्र गौतम तर उपसभापती म्हणूनणू नोहरलाल चौधरी विजयी झाले. १० सदस्य असलेल्या पंसमध्ये गौतम व चौधरी यांना प्रत्येकी ७ मते मिळविली. तर कांग्रेसचे तारेंद्र रामटेके व राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिला ब्राह्मणकर प्रत्येकी ३ मते मिळाली. दरम्यान भाजपचे पंस सदस्य तिलक मडावी, सुनंदा उके, योगिता पुंड, सरिता हरिनखेडे, संगिता शेंडे भाजपाचा विजयाचा जल्लोष साजरा केला. नवनिर्वाचित सभापती, उपसभापती व सदस्यांचे माजी आ. केशवराव मानकर, माजी जिप अध्यक्ष विजय शिवनकर, भाजपा तालुकाध्यक्ष काशीराम हुकरे, महामंत्री नरेंद्र वाजपेयी, राजु पटले, राकेश शेंडे, अनिरुद्ध शेंडे, घनश्याम अग्रवाल, सुषमा भुजाडे,तोषीका पटले, मोहिनी निबांर्ते, अंजली जांभूळकर, लक्ष्मण चुटे, सुधीर पटले, सुरेंद्र हरिणखेडे, गोविंद कटरे, यशवंत पुंड, तेजराम उके, यशवंत मानकर, सुनील पडोळे, बाळू भुजाडे, संतोष फुंडे आर्दीनी अभिनंदन केले.**



## देवरी पं.स.वर भाजपच

**देवरी : देवरी पंचायत समितीच्या सभापती उपसभापती पदासाठी आज झालेल्या निवडणुकीत सभापतीपदी अंबिका बंजार तर उपसभापतीपदी अनिल बिसेन यांची निवड झाली. देवरी पंचायत समितीच्या एकूण १० जागांसाठी निवडणूक झाली होती. यापैकी ६ जागांवर भाजपने विजय प्राप्त करीत सत्तेच स्पष्ट बहुमत मिळविले आहे. तर काँग्रेसला ४ जागांवर समाधानी व्हावे लागले. या पंचायत समितीमध्ये राकाँला खातेही उघडता आले नव्हते. भाजपचे तालुका अध्यक्ष अनिल येरणे, प्रमोद संगीडवार, महेश जैन, इंद्रजित सिंग भाटिया, प्रवीण दहीकार, यांच्या सह भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.**